जा.क्र./नांवाशमनपा/यांत्रिकीवि/537/10
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक : 17.03.2010

## टँकर्स किरायाने घेणेसाठीची दरपत्रक सुचना

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित टँकर्सव्दारे पाणी पूरवठा करण्यासाठी खालील प्रमाणे टँकर्स किरायाने घेण्यासाठी दर निश्चिती करण्याकरिता दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

कोरी दरपत्रके उप अभियंता (यांत्रिकी), स्विमींग पूल, पहिला मजला, स्टेडीयम परिसर,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत दिनांक 18/03/2010.ते दिनांक 23/03/2010रोजी पर्यंत दुपारी 2.00 वाजेपर्यंत प्राप्त करता येतील.

प्रत्येक कोऱ्या दरपत्रकाची किंमत रु. 500/- (विना परतावा) असून प्रत्येक दरपत्रकासह रु.2000/- चे आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांचे नावे असलेले कॉल डिपॉझीट / फिक्स डिपॉझीट जोडणे आवश्यक आहे.

पूर्ण भरलेली सीलबंद दरपत्रके वरील प्रमाणे कार्यालयात दिनांक 25/03/2010 रोजी दुपारी 2.00 वाजेपर्यत स्विकारल्या जातील.

| अ.क्र. | टँकर्सचा प्रकार |
|---|---|
| 1. | ट्रक माऊंटेड टँकर 10000 ते 12000 लिटर क्षमता |
| 2. | टेम्पो माऊंटेड टँकर 4000 ते 5000 लिटर क्षमता |
| 3. | ट्रॅक्टर - टँकर 4000 ते 5000 लिटर क्षमता |
| 4. | ॲटो मिनीडोअर टँकर 1200 लिटर क्षमता |

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

1. महापालिकेच्या आवश्यकते प्रमाणे टँकर्स किरायाने घेण्यात येतील.
2. वाहन सुस्थितीत असणे व वाहन चालक प्रशिक्षित असणे आवश्यक राहील.
3. वाहनाचा वीमा काढलेला असने आवश्यक आहे.
4. कोणत्याही प्रकारच्या अपघातास महापालिका जबाबदार राहणार नाही.
5. सदरची दर निश्चिती सालसन 2010 - 2011 करिता राहील.
6. दररोज साधारणत: 50 कि.मी. धाव गृहित धरुन इंधनासह व इंधनाशिवाय दर मागविण्यात येत आहेत.
7. एकदा दर निश्चिती झाल्यानंतर जर दरपत्रकधारक मागणी एवढे टँकर्स पुरवठा करण्यास असमर्थ ठरल्यास त्यांचे दराने दुसऱ्या वाहन मालकांचे टँकर्स किरायाने घेण्यात येतील.
8. वाहन / टँकर किरायाने देणेसाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाची परवानगी / परवाना असने आवश्यक आहे.

एखादी अथवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे.

स्वाक्षरित/-
आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रतिलिपी माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :

1. मुख्य लेखापरिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
2. मुख्य लेखाधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
3. अंतर्गत लेखापरिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
4. महानगरपालिका नोटीस बोर्ड
5. महानगरपालिका वेबसाईट
6. प्रति संपादक दै. लोकमत / दै. प्रजावाणी . . यांना देवून कळविण्यात येते कि, वरील परपत्रक सुचना आपले वृत्त पत्रात कमीत कमी जागेत प्रसिध्द करुन जाहिरातीचे देयक दरपत्रकासह या कार्यालयात सादर करावे.

आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड करिता